शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांचे समोर...

**तक्रार अर्ज क्र.०७/२०१८**

१. डॉ. श्रीमती सुगंधा हिंदूराव घरपणकर } तक्रारदार

विरूध्द

राजा शिवछत्रपती कला आणि वाणिज्य महाविद्यालय महागांव, गडहिंग्लज } वि. प

**तक्रार अर्ज क्र.०८/२०१८**

२. श्री. रावसाहेब गणपती मोंगले } तक्रारदार

विरूध्द

राजा शिवछत्रपती कला आणि वाणिज्य महाविद्यालय महागांव, गडहिंग्लज } वि. प

**तक्रार अर्ज क्र.०९/२०१८**

३. श्री. सुकुमार दादू आवळे } तक्रारदार

विरूध्द

राजा शिवछत्रपती कला आणि वाणिज्य महाविद्यालय महागांव, गडहिंग्लज } वि. प

राजा शिवछत्रपती कला आणि वाणिज्य महाविद्यालय महागांव, तालुका गडहिंग्लज, जिल्हा कोल्हापूर येथील (१.सहाय्यक प्राध्यापिका डॉ. सुगंधा हिंदूराव घरपणकर, २. सहाय्यक प्राध्यापक श्री. रावसाहेब गणपती मोगले, ३. श्री. सुकुमार दादू आवळे) यांनी स्वतंत्र तीन तक्रार अर्ज तक्रार निवारण समितीकडे दि. १५/०७/२०१५ रोजी दाखल केलेले आहे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

## तक्रारीचे स्वरूप :

श्रीमती सुगंधा हिंदूराव घरपणकर यांनी माहे जुन १९९७ ते ऑक्टोंबर १९९८ या काळात चुकीच्या पद्धतीने वेतन वसुली आणि माहे डिसेंबर २०१४ ते जानेवारी २०१५ च्या वेतनातून वसुली केल्याची तक्रार मांडली आहे. तशीच तक्रार प्रा. रावसाहेब गणपती मोगले यांनी आपल्या अर्जात आणि तशीच तक्रार प्रा. सुकुमार दादू आवळे यांनी आपल्या तक्रारी अर्जात नमुद केली आहे.

दि. १३/०४/२०१८ रोजी तक्रारदार श्रीमती सुगंधा हिंदूराव घरपणकर, श्री. रावसाहेब गणपती मोगले व श्री. सुकुमार दादू आवळे हे आपले म्हणणे मांडण्याकरिता हजर होते. दि. १३/०४/२०१८ रोजी संस्था व महाविद्यालय प्राचार्य तर्फे कोणीही हजर राहिले नाही. पुनश्च तक्रारदार व संस्था, महाविद्यालयास दि. २०/०४/२०१८ रोजी नोटीस देऊन म्हणणे मांडणे करिता संधी देण्यात आली. दि. २०/०४/२०१८ रोजी प्रकरण सुनावणीकरिता तिन्ही तक्रारदार हजर होते. परंतु, संस्थे तर्फे व महाविद्यालय तर्फे कोणीही हजर नव्हते.

थोडक्यात तक्रारदार यांनी एकत्रित तक्रार अशी मांडली की, तिनही तक्रारदार यांना कार्यभार कमी झाल्याने व सेट, नेट परीक्षा उत्तीर्ण नसल्यामुळे दि. १९/०६/१९९९ पासून कमी करण्यात आले. त्यावेळी त्यांनी विद्यापीठ ट्रॅब्युनल व मुंबई उच्च न्यायालयात दाद मागितली. परंतु, उच्च न्यायालयाच्या मिनिटस् ऑफ ऑर्डरने दि. २४/१०/२००२ ने त्यांनी केस मागे घेतली व कार्यभार उपलब्ध झाल्याने ते पुन्हा दि. २३/०६/२००३ रोजी महाविद्यालयीन पुर्वपदावर हजर झाले व आजपर्यंत ते कार्यरत आहेत. संस्थेने जुन १९९७ ते ऑक्टोबर १९९८ या काळातील वेतन वसुलीची महाविद्यालयीन प्रशासनाकडे पत्रे दिली आहेत व त्या पत्रांना वेळोवेळी उत्तरेही दिली आहेत. जुन १९९७ ते १९९८ या काळात प्रा. महादेव गुंडप्पा माने (राज्यशास्त्र) हे प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यरत होते. तत्कालीन प्रभारी प्राचार्य/संस्था प्रशासनाने त्यांना कार्यभार कमी अथवा पद अमान्य झालेले आहे असे लेखी पत्राने अगर तोंडी तक्रारदारांना कळविलेले नाही. दि. १९/०९/१९९९ ला कार्यभार कमी झाल्याने पदमुक्त केल्याचे पत्र दिले. परंतु, प्रत्यक्षात ते जुन १९९७ ते ऑक्टोबर १९९८ या काळात ते सेवेत कार्यरत होते.

दि. १८/१०/२०१३ रोजी विद्यापीठाच्या तक्रार निवारण समितीकडे तत्कालीन प्राचार्य महादेव माने यांनी त्यांचे वेतन कपातीबाबत व इतर समस्यांबाबत अर्ज केला होता. त्यावेळी सदर तक्रारदारांना कोणत्याही प्रकारे लेखी विचारणा केली नाही. तत्कालीन, लेखी वसुलीचे पत्र महाविद्यालयीन प्रशासनाला पाठविलेले दिसते. त्यामुळे तक्रारदार यांचे एकत्रित म्हणणे असे आहे की, विद्यापीठाच्या तत्कालीन समितीचा ठराव हा पूर्णपणे एकांगी स्वरूपाचा आहे व त्यांची दि. २२/०७/२०१४ रोजीची विनंती अमान्य केली गेली. म्हणून, त्यांनी या विषयाची चौकशी करण्यासाठी तक्रारी अर्ज दिला. पुढे ते असे म्हणतात की, प्रभारी प्राचार्य श्री. महादेव माने यांची दि. २८ ऑगस्ट, २००४ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या चौकशी समितीची बैठक बोलावून त्यावर महाविद्यालयाने दि. २९/११/२००५ रोजी त्यांच्या विरूद्‌ध चौकशीचा अहवाल पाठविला असल्यामुळे त्यांच्या विरूद्‌ध स्टॅटयूट नुसार कार्यवाही करणेबाबत मान्यता दिली होती. त्यामुळे त्यांचे असे म्हणणे आहे की, सदर प्राचार्य महादेव माने यांनी केलेल्या चुकीमुळे प्रत्यक्षात सदर तक्रारदारास त्यांच्या वेतन कपातीच्या नुकसानीस सामोरे जावे लागत आहे.

सन १९९७–९८ साली श्री. माने हे प्रभारी प्राचार्य होते. मा. शिक्षण सहसंचालक, कोल्हापूर यांचे दि. ०१/१०/१९९७ रोजीच्या पद मान्यतेनुसार प्रा. आवळे, प्रा. ~~कांबळे~~ मोगले व श्रीमती पवार (घरपणकर) यांचा कार्यभार पुरेश्या विद्यार्थी संख्येअभावी मान्यता झाली होती. तसेच, श्री. माने यांनी वरील कर्मचाऱ्यांचे पगार दि. २७/१२/१९९७ रोजी संस्थेला पूर्व सूचना न देता बेकायदेशीरपणे कमी केले. तद्‌नंतर, संस्थेने अचानकपणे कर्मचाऱ्यांना अगावू नोटीसा देवून सेवेतून कमी केले होते. त्यानंतर सदर कर्मचारी हे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यभार उपलब्ध झाल्यानंतर कामावर पुन्हा रूजू झालेचे कागदोपत्री दिसून येते. सदर कालावधीमध्ये केलेले कामकाज व महाविद्यालयाचे झालेले नुकसान या संदर्भात संस्थेचे जा.क्र. २७/२००३/२००४ दि. १७/०२/२००४ ने श्री. माने यांची चौकशी होवून त्यांच्या विरूद्‌ध अहवाल देण्यात आला आणि विद्यापीठाने संस्थेच्या अधिकारात त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यास मान्यता दिली व त्यानुसार संस्थेने त्यांच्या मासिक वेतनातून पगार कपात करण्याबद्‌दल महाविद्यालयास आदेश दिले होते. त्यानंतर श्री. माने यांच्या वेतनातून महाविद्यालयाने वसुली सुरू होती. आता, डिसेंबर २०१४ पासून वेतनातून मात्र तक्रारदारांच्या वेतनातून कपात सुरू केली आहे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

तत्कालीन तक्रार निवारण समितीने त्यावेळी संस्थेचा अभिप्राय घेवून आणि विद्यापीठाकडील कार्यालयीन निवेदन घेवून तक्रार निवारण समितीने ठराव पारीत केला की, श्री. माने यांच्या वेतनातून दरमहा होणारी कपात सत्वर बंद करण्यात यावी आणि सदर तक्रारदार यांच्या वेतनातून रक्कम वसूल करण्यात यावी. तसेच, श्री. माने यांच्या वेतनातून जी रक्कम कपात करण्यात आलेली आहे ती रक्कम त्यांना परत देण्यात यावी.

वरील सर्व एकंदर विषयाचा अभ्यास केल्यानंतर तसेच उपलब्ध कागदपत्रांनुसार असे या समितीच्या निदर्शनास आले की सदर तक्रारदार शिक्षकांची बाजू कोणत्याही टप्प्यावर ऐकण्यात आलेली नाही.

वास्तविक पहाता या अर्जदारांच्या वेतनातून जी कपात झालेली होती ती प्रभारी प्राचार्य श्री. माने यांच्या (चुकीमुळे) झाली होती. श्री. माने सदर महाविद्यालयातील नोकरी सोडून गेल्यामुळे त्यांच्या पगारातील कपात बंद करण्यात आली व सदर तीन शिक्षकांच्या पगारातून वेतन कपात सुरू करण्यात आली. तसेच, श्री. माने यांच्या वेतनातून जी कपात करण्यात आली होती ती संस्थेने त्यांना परत दिली आहे किंवा कसे याची स्पष्टता या समितीसमोर आलेली नाही. सदर तीनही तक्रारदारांच्या बाबतीत संस्था व महाविद्यालयीन प्राचार्य यांना आपली बाजू मांडण्यासाठी वेळोवेळी पुरेशी संधी देवून सुद्धा त्यांनी आपली बाजू मांडलेली नाही. कोणत्याही परिस्थितीत हे या समितीच्या निश्चितपणे समोर आलेले आहे की, या तीन तक्रारदार सहा. प्राध्यापकांच्या पगारातून जी कपात केली जात आहे त्याच्या बाबतीत त्यांचे कोणतेही म्हणणे संस्थेने ऐकुन घेतलेले नाही. त्या तक्रारदारांनी केलेल्या अर्जाच्या बाबतीत ज्या व्यक्तीच्या पगारातून आर्थिक कपात केली जाणार आहे त्यांची बाजू ऐकून न घेता त्यांच्या विरूदध दिलेले निर्णय हा नैसर्गिक न्याय तत्वास धरून झालेला असल्याचे दिसून येत नाही. या समितीने संस्था आणि महाविद्यालय यांना या तीनही तक्रारदारांच्या अर्जाबाबत आपले म्हणणे सादर करण्यासाठी नोटीसा बजावून सुद्धा या पैकी कोणतेही तक्रारीबाबत लेखी अथवा तोंडी स्वरूपात प्रत्यक्षात हजर राहून आपली बाजू समिती समोर मांडलेली नाही. त्यामुळे सदर समिती एक मताने खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

## — निर्णय —

सदर सर्व तक्रारदार श्री १) सहा.प्रा.रावसाहेब गणपती मोगले २) सहा.प्रा. श्रीमती डॉ.सुगंधा घरपणकर ३) सहा.प्रा. सुकुमार दादू आवळे यांच्या वेतनातून संस्था आणि प्राचार्य यांनी सध्या करीत असलेली कपात पुढील हुकूम होईपावेतो थांबवावी.सदर आदेशाच्या कार्यवाही केलेबाबत विद्यापीठाकडे लेखी अहवालाने कळवावे.

दि. १५/०५/२०१८

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

अध्यक्ष

अध्यक्ष
तक्रार निवारण समिती,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

सदस्य

सदस्य

सदस्य

सदस्य

सदस्य सचिव